महात्मा फुले विद्यालयात २२०० विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचा कानमंत्र

अहमदपूर/प्रतिनिधी :

येथील राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्लिक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती उपक्रमांतर्गत महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अहमदपूर येथे विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८.०० ते ९.१५ या वेळेत पार पडलेल्या या सत्रात इयत्ता ५ वी ते १० वी मधील तब्बल २२०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती हे या सत्राचे विशेष आकर्षण ठरले. या सत्रासाठी सायबर वॉरिअर नरेश पंडित यांच्यासोबत अविष्कार कांबळे उपस्थित होते. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना डिजिटल जगात वावरताना घ्यावयाच्या काळजीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी ऑनलाइन फसवणूक, फिशिंग व संशयास्पद लिंक, फोटो मॉर्फिंग, ए.आय. च्या माध्यमातून होणारा गैरवापर, ऑनलाइन गेम्सचे दुष्परिणाम, मजबूत पासवर्ड, ओ.टी.पी. व वैयक्तिक माहितीची सुरक्षितता, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर तसेच मोबाईल ॲप्सना परवानगी देताना घ्यावयाची खबरदारी अशा विविध विषयांवर विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. सायबर गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, कोणालाही ओ.टी.पी. किंवा पासवर्ड न सांगणे, सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर न करणे आणि कोणतेही ॲप डाउनलोड करताना आवश्यक परवानग्याच देणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. तसेच ऑनलाइन फसवणूक झाल्यास राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले. सत्राच्या शेवटी विद्यार्थ्यांसोबत प्रश्नोत्तरांचा संवाद घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध प्रश्न विचारले असून त्यांचे समाधानकारक निरसन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा विषयक माहितीपत्रके वितरित करण्यात आली. कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक जाधव एस. आर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मुसळे एन. आर, माने सर आणि देशमुख एस. एच यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. विद्यालयातील शिक्षकवृंदाच्या सहकार्याने सत्र यशस्वीरीत्या पार पडले.